| Event Tile | हिंदी दिवस समारोह **“ वर्तमान समय में हिंदी भाषा एवं साहित्य अध्ययन की उपयोगिता”** |
|---|---|
| Organized By | हिंदी विभाग |
| Date Of Organization | 16 सितंबर 2022 |
| Funding Agency | सांगोला कॉलेज , सांगोला |
| Collaboration/MOU | ---- |
| Description | 14 सितंबर  हिंदी दिवस समारोह का 16 सितंबर 2022 को  आयोजन किया गया इस समारोह के प्रमुख अतिथि डॉ . अर्जुन चव्हाण (भूतपूर्व अध्यक्ष,हिंदी विभाग,शिवाजी विश्वविद्यालय, कोल्हापुर) थे। इस समारोह में ५५ छात्र उपस्थित थे।इस उपलक्ष्य में हिंदी निबंध  और संदेशलेखन प्रतियोगिता का आयोजन किया था। |
| Photographs |  |

# बहुभाषिक होणेकाळाची गरज : प्रो. डॉ. अर्जुन चव्हाण

**सांगोला / प्रतिनिधी :**

येथील सांगोला महाविद्यालय, सांगोला, हिंदी विभाग व महाराष्ट्र हिंदी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १६सप्टेंबर २०२२ रोजी ‘ हिंदी दिवस समारोह’ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी हिंदी विभाग प्रमुख,नामवंत समीक्षक ,लेखक, अनुवादक,गजलकार प्रो.डॉ अर्जुन चव्हाणहे होते . या प्रसंगी डॉ. अर्जुन चव्हाण यांनी वैश्विक पटलावरती हिंदीचे स्थान, आजच्या युगात हिंदीचे महत्व, साहित्य, सिनेमा व सोशल मिडीयामध्ये हिंदी च्या मध्यामातून रोजगाराच्या संधी यावर महत्वपूर्ण विचार मांडले . त्यांनी आपल्या मनोगता मध्ये आजच्या युगात बहुभाषिक होणे किती आवश्यक आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले.आजच्या काळात बहुभाषिकताच रोजगार उपलब्ध करुन देवू शकते यावरभर देवून हिंदी बरोबरच मराठी , इंग्रजी व अन्य देशी विदेशी भाषांचेज्ञानकाळाची गरज आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.आपल्या अध्यक्षीय मनोगता मध्ये महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. मधुसूदन बचुटे यांनी भाषेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी उच्चारण व लेखन शुद्धताव भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यावर भर द्यावा असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाप्रसंगी हिंदी सप्ताह अंतर्गत आयोजित निबंध स्पर्धा व लघु संदेशलेखनस्पर्धेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या कार्याक्रमचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ . नवनाथ शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन व सूत्र संचालन डॉ . मालोजी जगतापयांनी केले . या कार्यक्रमासाठी हिंदी विभागातील आजी व माजी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.